**<u>ठळक बातम्या</u>**

'एक देश एक निवडणूक' साठी संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक ८ जानेवारी रोजी होणार

- ई- कॉमर्समधले संशयित गैरव्यवहार हुडकून काढण्यासाठीच्या विविध उपाययोजनांचं केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- हरित उर्जेच्या माध्यमातून राज्यातले शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा मुख्यमंत्र्यांना विश्वास

**आणि**

- प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक शाम बेनेगल यांना अखेरचा निरोप

<><><><><>

'एक देश एक निवडणूक' साठी संयुक्त संसदीय समितीची पहिली बैठक ८ जानेवारी रोजी होणार आहे. संसदेच्या पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्याच्या पहिल्या दिवशी ही समिती आपला अहवाल सादर करणार आहे. भाजपाचे ज्येष्ठ खासदार पी पी चौधरी यांच्या अध्यधतेखाली होणारी ही बैठक प्रास्ताविक स्वरुपाची असणार आहे. कायदा आणि न्याय मंत्रालयाचे प्रतिनीधी समितीच्या सदस्यांना या दोन्ही विधेयकांबद्दल माहिती देतील.  या समितीमध्ये लोकसभेचे २७ आणि राज्यसभेचे १२ असे एकूण ३९ सदस्य आहेत. या विधेयकांना अधिकृतपणे संविधान एकशेवीसावी सुधारणा विधेयक आणि केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक असं नाव देण्यात आलं आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त ऑनलाईन व्यासपीठांवरचा धोका ओळखण्यासाठी आणि ग्राहकांना सक्षम करण्यासाठी केंद्रीय ग्राहक व्यवहार मंत्री प्रल्हाद जोशी यांनी आज तीन नव्या ऍपचं उद्घाटन केलं. यात जागो ग्राहक जागो ऍप, जागृती ऍप, आणि जागृती डॅशबोर्डचा समावेश आहे. या ऍपमुळे फसवणुकीच्या प्रकरणाविरोधात कारवाई करणं केंद्रीय ग्राहक संरक्षण प्राधीकरणाला शक्य होणार आहे. जागो ग्राहक ऍपमुळे ग्राहकांना URL ची माहिती मिळणं शक्य होणार आहे. तसंच यातून काही धोका असल्यास ग्राहकाला सावधानतेचा इशारा दिला जाणार आहे. जागृती ऍपमुळे ग्राहकांना URL ची तक्रार करता येणार आहे.

सरकार ग्राहकांच्या हक्कांचं संरक्षण करण्यासाठी वचनबद्ध आहे असं प्रल्हाद जोशी यांनी यावेळी सांगितंल. सुरक्षित, पारदर्शक बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि ऑनलाईन व्यासपीठांवरील फसवणूक रोखण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचंही जोशी म्हणाले.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज नवी दिल्ली इथं आर्थिक क्षेत्रातल्या तज्ज्ञांशी चर्चा केली. केंद्रीय अर्थसंकल्प मांडण्यापूर्वीची तयारी म्हणून ही बैठक झाली. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन, निती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी व्ही आर सुभ्रमण्यम आणि इतर वरिष्ठ अधिकारी बैठकीला उपस्थित होते.

**<><><><><>**

राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाच्या अध्यक्षपदी सर्वोच्च न्यायालयातून निवृत्त झालेले न्यायमूर्ती व्ही. रामसुब्रमण्यम यांची नियुक्ती राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केली आहे. प्रियांक कानुंगो आणि निवृत्त न्यायमूर्ती डॉ. विद्युत रंजन सारंगी यांचीही सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

**<><><><><>**

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वित्त आणि नियोजन तसंच राज्य उत्पादन शुल्क विभागाचे मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर आज सकाळी मंत्रालयात दोन्ही विभागांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन कामकाजाचा आढावा घेतला. यावेळी वित्त आणि नियोजन राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मत्स्यव्यवसाय आणि बंदर विकास खात्याचा पदभार मंत्री नितेश राणे यांनी आज मंत्रालयात स्वीकारला. आणि विभागातल्या अधिकाऱ्यांसमवेत बैठक घेऊन आढावा घेतला.

**<><><><><>**

राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम ही मोहिम या महिन्यात सुरु झाली. या मोहिमेंतर्गत निःक्षय ही रुग्ण व्यवस्थापन प्रणाली राबवण्यात येत आहे. क्षयरोगाचे लवकर निदान करुन तात्काळ उपचार करण्यासाठी अकोला जिल्ह्यात आजपासून सक्रिय क्षयरुग्ण शोध मोहिम राबवण्यात येत आहे. प्रशासन आणि आरोग्य विभागाने संभाव्य क्षयरुग्णांचा शोध घेण्यासाठी वैद्यकीय पथकं तयार केली आहेत. निदान झालेल्या रुग्णांना शासनाकडून

मोफत औषधोपचार आणि पोषण आहारासाठी आर्थिक मदत दिली जाणार आहे.

<><><><><>

राज्यभरात सौर उर्जेचा वापर करणारी सौर ग्राम तयार करण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून राज्यातले शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प 2.0 अंतर्गत वाशिम जिल्ह्यातल्या उंबरठा आणि धाराशिव जिल्ह्यातल्या नारंगवाडी या गावातल्या प्रकल्पांचं लोकार्पण दूरदृश्य प्रणालीद्वारे करताना ते बोलत होते. शेतकऱ्यांना 16 हजार मेगावॅट इतकी वीज पुरवणारे सर्व फीडर सौरऊर्जेवर आणण्याचेंकाम सुरू आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फिडर सौर उर्जेवर आणण्यात येतील. आणि शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होऊ शकेल, असं मुख्यमंत्री म्हणाले.
यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते. तसंच उंबरठा आणि नारंगवाडी गावातले शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

<><><><><>

शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळावी यासाठी सौर कृषी पंपांसाठी स्वतंत्र वीज वितरण प्रणाली उभारण्याची मागणी विधानपरिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केली. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं

पत्रकारपरिषदेत बोलत होते. राज्य सरकारला शेतकऱ्यांच्या समस्या सोडवण्यात आणि विदर्भ, मराठवाड्यात नवीन गुंतवणूक आणण्यात अपयश आल्याची टीका त्यांनी केली.

<><><><><>

ख्यातनाम चित्रपट दिग्दर्शक दिवंगत श्याम बेनेगल यांच्या पार्थिवावर आज मुंबईच्या शिवाजीपार्क स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

शाम बेनेगल यांनी  सामाजिक वास्तव आणि संवेदनशीलता यांचा सखोल वेध घेणारे चित्रपट केले. त्यांचं काम भारतीय सिनेमाला समृद्ध करणारं होतं, असं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शाम बेनेगल यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.त्यांच्या कामाला पुढील पिढ्यांचीही प्रशंसा मिळत राहील, असं प्रधानमंत्र्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

बेनेगल यांच्या निधनामुळे चित्रपट निर्मात्यांना प्रेरणा देणारा एक प्रतिभावंत निर्माता - दिग्दर्शक आपण गमावला आहे अशा शब्दात  राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी शोक भावना व्यक्त केल्या.

भारतीय चित्रपट सृष्टीत वास्तववादी चित्रपट निर्मितीचे समांतर पर्व आणणारे श्याम बेनेगल अजरामर राहतील अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बेनेगल यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

बेनेगल यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीच्या इतिहासातला सोनेरी अध्याय संपला आहे”, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दु:ख व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

नंदुरबार जिल्ह्यातल्या प्रसिद्ध सारंगखेडा महोत्सवात अवघ्या दहा दिवसात तीन कोटी रुपयांचे व्यवहार झाले. १४ डिसेंबरपासून या महोत्सवाला सुरवात झाली. यात देशभरातल्या विविध प्रांतातून २ हजार २१० घोडे खरेदी विक्रीसाठी दाखल झाले होते.

**<><><><><>**

भारतीय हवामानशास्त्र विभागाने वर्तवलेल्या अंदाजांच्या अचूकतेत गेल्या दहा वर्षांत ४० ते ५० टक्क्याची वाढ झाली असं विभागाचे महासंचालक मृत्युंजय महापात्रा यांनी सांगितलं आहे.भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या स्थापनेला येत्या १५ जानेवारीला दीडशे वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त ते बोलत होते. अतिवृष्टीच्या अंदाजाची अचूकता देखील ६० टक्क्याहून ८० टक्क्यापर्यंत वाढली असल्याचं त्यांनी सांगितलं. या विभागामार्फत सध्या साडेपाचशे विभागीय वेधशाळा, दोन हजार स्वयंचलित हवामान केंद्र आणि ३९ ठिकाणी डॉप्लर रडार प्रणाली कार्यरत आहेत, असंही ते यावेळी म्हणाले. पुढच्या दोन वर्षांत आणखी ३४ रडार बसवले जातील ज्यामुळे पुढच्या पाच वर्षांत याच अंदाजांच्या अचूकतेत आणखी १० ते १५ टक्के वाढ होईल, असा विश्वासही महापात्रा यांनी व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

राज्याच्या विविध भागांमध्ये २६ ते २८ डिसेंबरदरम्यान मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. २६ डिसेंबर रोजी कोल्हापूर, सांगली, सोलापूर जिल्ह्यांतल्या दक्षिणेकडच्या तुरळक भागांत, २७ डिसेंबर रोजी खानदेश, मध्य महाराष्ट्र, उत्तर मराठवाडा, आणि पश्चिम विदर्भात विविध ठिकाणी, तर २८ डिसेंबर रोजी खानदेश, मराठवाड्यातले उत्तरेकडचे जिल्हे आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर या भागातल्या शेतकऱ्यांनी कृषिविषयक सल्ला आणि हवामानाच्या अंदाजाकडे लक्ष ठेवून त्यानुसार नियोजन करावं, असं आवाहन कृषी विभागानं केलं आहे.

**<><><><><>**

चेन्नई इथं झालेल्या दक्षिण पश्चिम विभागीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेत मुंबई विद्यापीठानं एक सुवर्ण आणि एक रौप्यपदक पटकावलं आहे. या स्पर्धेत महाराष्ट्रासह विविध नऊ राज्यातल्या ८० विद्यापीठांचे जलतरण संघ सहभागी झाले होते. मुंबई विद्यापीठाच्या अकरा जलतरणपटूंच्या संघाची अखिल भारतीय आंतर विद्यापीठ जलतरण स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

**<><><><><>**

महिला क्रिकेटमध्ये आयसीसी चॅम्पियनशिप स्पर्धेचा दुसरा एकदिवसीय सामना आज वडोदरा इथं सुरू आहे. या सामन्यात हरमनप्रीत कौर हिच्या नेतृत्वाखाली भारतीय संघ वेस्ट इंडिज विरुद्ध खेळत आहे. या स्पर्धेच्या

पहिल्या सामन्यात भारतीय संघाने वेस्ट इंडिजवर २११ धावांनी विजय मिळवून मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे. आजच्या सामन्यात भारतीय संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारताच्या  २२  षटकात एक बाद १३१ धावा झाल्या होत्या.

//<><><><><>//